**मा.महापालिका आयुक्त तथा प्रशासक**
**पुणे महानगरपालिका**

नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दिनांक – १०/११/२०२२

**पुणे महानगरपालिका – सूचना – कार्यपत्रिका क्र.९**
**नोव्हेंबर २०२२**

पुणे महानगरपालिकेची मासिक सर्वसाधारण सभा **शुक्रवार,दि.१८/११/२०२२** रोजी **दुपारी ४.०० (चार)** वाजता **महापालिका आयुक्त कार्यालयात** भरेल.

**मा.महापालिका आयुक्त तथा प्रशासक, पुणे महानगरपालिका यांचे निर्णयार्थ खालीलप्रमाणे विषय सादर करण्यात येत आहेत.**

**वृत्तांत कायम करणे.**

**प्रश्नोत्तरे**

महाराष्ट्र म.न.पा अधिनियम, १९४९ चे कलम ४४ अन्वये प्रश्नोत्तरे.

**– स्थायी समितीचे ठराव –**

**विषय क्र.२२३**

**संदर्भ–** १) मा.सौ.अर्चना पाटील व मा.बाळा ओसवाल यांचे दि.२१/१२/२०२१ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र.१७८३,दि.२१/१२/२०२१
३) मनपा ठराव क्र.८१५,दि.१७/२/२०२२
४) मनपा ठराव क्र.१२४,दि.२५/७/२०२२
५) मनपा ठराव क्र.१६९,दि.२३/९/२०२२

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे महानगरपालिका सेवा ( सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण ) नियम –२०१४ मध्ये खालीलप्रमाणे दुरूस्ती करण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अ.क्र | संवर्ग | पदनाम | नेमणुकीची पध्दत व टक्केवारी | नेमणुकीची अर्हता व नेमणुकांच्या पध्दती | प्रस्तावित सुधारणा |
|---|---|---|---|---|---|
| १३९ | अभियांत्रिकी सेवा श्रेणी –२ | उप अभियंता (स्थापत्य) | नामनिर्देशन –२५% | अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची अभियांत्रिकी शाखेची पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक | पदोन्नती –१००% स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी/पदविका ही शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या पुणे मनपाच्याआस्थापने वरील सेवाज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे शाखा अभियंता ( स्थापत्य ) या पदावर कार्यरत असणे आवश्यक |
| | | | पदोन्नती –७५% | स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी/पदविका ही शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या पुणे मनपाच्या आस्थापने वरील सेवाज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे शाखा अभियंता ( स्थापत्य ) या पदावरील किमान ०३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक | |

( टीप :– पुणे महानगरपालिकेकडील शाखा अभियंता ( स्थापत्य ) या पदावरील सेवकांची पदोन्नतीची कुंठीता घालविण्यासाठी वरीलप्रमाणे पुणे महानगरपालिका सेवा ( सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण ) नियम २०१४ मध्ये बदल करणे आवश्यक आहे.)

( टीप – सदर विषयाचा विचार माहे नोव्हेंबर २०२२ च्या कार्यपत्रिकेवर घ्यावा असा मनपा ठराव क्र.२१७, दि.१/११/२०२२ चा झाला आहे. )

विषय क्र.२२४

संदर्भ :- १) मा.सौ.अर्चना पाटील व मा.महेश वाबळे यांचे दि.११/१/२०२२ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१९८३,दि.११/१/२०२२
३) मनपा ठराव क्र.८०४, दि.१७/२/२०२२
४) मनपा ठराव क्र.१२५, दि.२५/७/२०२२

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

सॅन ॲड्स औंध पुणे ह्या जाहिरातक्षेत्रात काम करणाऱ्या कंपनीला ६० फुट X ३० फुट महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये मुख्य रस्त्यालगत ५० ठिकाणी अद्यायावत शौचालय महानगरपालिकेसाठी मोफत बांधण्यासाठी, त्यावरील जाहिरात हक्क व जागेसाठी २० वर्षाकरिता करार करण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे .

(टीप-सदर विषयाचा विचार माहे नोव्हेंबर २०२२ च्या कार्यपत्रिकेवर घ्यावा असा मनपा ठराव क्र.१७०, दि.२३/९/२०२२ चा झाला आहे. )

विषय क्र.२२५

संदर्भ :- १) मा. महेश वाबळे, मा. सौ. अर्चना पाटील, मा.सौ. उज्ज्वला जंगले, मा. प्रदीप गायकवाड, मा. राजाभाऊ लायगुडे, मा.विशाल तांबे, मा.राहुल भंडारे , मा. सौ. अश्विनी कदम, मा. श्रीमती. लता राजगुरू, मा.सौ. मानसी देशपांडे , मा. सौ. सुनिता गलांडे यांचे दि. ११/०३/२०२२ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२५३५, दि.११/३/२०२२
३) मनपा ठराव क्र.५, दि.११/४/२०२२
४) मनपा ठराव क्र.१२६, दि.२५/७/२०२२

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

PMPML च्या सेवकांचे (चार कोटी )आरोग्य बिलासाठी ४ कोटी देण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

( टीप - सदर विषयाचा विचार माहे नोव्हेंबर २०२२ च्या कार्यपत्रिकेवर घ्यावा असा मनपा ठराव क्र.१७१, दि.२३/९/२०२२ चा झाला आहे. )

विषय क्र.२२६

संदर्भ :- १) मा. सौ. वर्षा तापकीर, मा. विशाल तांबे, मा.सौ. मानसी देशपांडे व मा.सौ.अश्विनी कदम यांचे दि. ११/०३/२०२२ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२५३६, दि.११/३/२०२२
३) मनपा ठराव क्र.६, दि.११/४/२०२२
४) मनपा ठराव क्र.१२७, दि.२५/७/२०२२

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

पी.एम.पी.एम.एल च्या सेवकांसाठी ७ व्या वेतन आयोगापोटी र.रू. ६ कोटी ( सहा कोटी )देण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

( टीप - सदर विषयाचा विचार माहे नोव्हेंबर २०२२ च्या कार्यपत्रिकेवर घ्यावा असा मनपा ठराव क्र.१७२, दि.२३/९/२०२२ चा झाला आहे. )

विषय क्र.२२७

संदर्भ :- १) मा. सौ. उज्ज्वला जंगले व मा. सौ. मनिषा कदम यांचे दि. ११/०३/२०२२ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२५३७, दि.११/३/२०२२
३) मनपा ठराव क्र.७, दि.११/४/२०२२
४) मनपा ठराव क्र.१२८, दि.२५/७/२०२२

----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

हिंदुस्थानाच्या वायव्य सीमेवर खैबर व बोलन खिंडीतून सुमारे २००० वर्षे अनेक परकीय आक्रमकांनी आपल्या

देशावर वारंवार आक्रमणे करून आपल्या देशाचे लचके तोडले होते. अशा आक्रांतांपैकी एक अफगाणिस्थानाचा बादशाह अहमदशाह अब्दाली सन १७६० साली पाचव्यांदा आक्रमण करून आला. तेव्हा अशा पाशवी आक्रमणाचा बिमोड करून देशाचे संरक्षण करण्याच्या हेतूने पुण्यातील शनिवार वाडा येथून सदाशिवराव भाऊंच्या नेतृत्वात मराठा सैन्याने उत्तरेकडे कूच केले. दिनांक १४ जानेवारी १७६१ रोजी हरियाणा मधील पानिपतावर दोन्ही सैन्यांमध्ये तुंबळ युद्ध झाले. या पानिपताच्या तिसऱ्या युद्धात मराठा सैन्यांनी आपल्या पराक्रमाची पराकाष्ठा केली व धगधगत्या राष्ट्रयज्ञकुंडात आपल्या देशासाठी आपल्या प्राणांच्या सुमारे सव्वा लाख आहुत्या दिल्या. मराठा सैन्यांनी आपल्या शौर्याने परकीय आक्रमकांना जोरदार तडाखा देऊन हिंदुस्थानाच्या वायव्य सीमेवर खिंडीतून येणारी सततची आक्रमणे थांबविली. खैबर व बोलन खिंडी आपल्या रक्तामांसाच्या चिखलाने लिंपून कायमच्या बंद केल्या आणि हिंदुस्थानावर चालून येणारा आक्रमक शत्रूंच्या वाटा रोखल्या. मराठे उत्तरेत गेले ते मातृभूमीच्या सीमा निश्चित करण्यासाठी, प्राणपणाने लढले ते हिंदुस्थानाच्या भौगोलिक सीमा राखण्यासाठी आणि लढता लढता हौतात्म्य पावले ते श्रीशिवछत्रपतींनी दाखविलेल्या स्वप्नपूर्तीसाठी आणि स्वाभिमान रक्षणासाठी.

पानिपतावरील पराक्रमी योद्ध्यांना व हौतात्म्यांना मानवंदना म्हणून महाराष्ट्रातील तरूण हरियाणा मधील ''कालाआम पानिपत रणभूमी स्मारक'' येथून शौर्य ज्योत प्रज्वलित करून पानिपत ते पुणे मार्गे दिल्ली, आगरा, ग्वाल्हेर, उज्जैन, इंदूर, धार या मार्गे अखंडितपणे पायी धावत घेऊन येणार आहेत. आपल्या पूर्वजांच्या पराक्रमाला साजेसे असे शूर हुतात्म्यांचे चिरस्थायी स्मारक पुण्यामध्ये व्हावे या उद्देशाने हि शौर्य ज्योत हौतात्म्य भूमी पानिपता वरून तत्कालीन राजकीय राजधानी पुणे येथे आणली जाईल. दिल्लीतील अमर जवान ज्योती धर्तीवर चिरंतन (३६५ दिवस २४ तास) शौर्य ज्योतीच्या रूपाने 'हौतात्म्य स्मारक' शनिवार वाड्यासमोरील थोरले बाजीराव पेशवे यांची अश्वारूढ मूर्ती आणि राष्ट्रध्वज तिरंगा याच्या मधील मोकळ्या जागेमध्ये स्थापन करण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

( टीप – सदर विषयाचा विचार माहे नोव्हेंबर २०२२ च्या कार्यपत्रिकेवर घ्यावा असा मनपा ठराव क्र.१७३,
दि.२३/९/२०२२ चा झाला आहे. )

**<u>विषय क्र.२२८</u>**

संदर्भ :– १) मा.सौ.लता धायरकर यांचे दि. ११/०३/२०२२ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२५३८, दि.११/३/२०२२
३) मनपा ठराव क्र.८, दि.११/४/२०२२
४) मनपा ठराव क्र.१२९, दि.२५/७/२०२२

––––

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

प्रभाग क्र. २१ ब, मधील स.नं. ७७, पिंगळे वस्ती, मुंढवा येथील जागेवर (अंदाजे ०.४४९ हेक्टर) चिल्ड्रन प्ले ग्राऊंडचे आरक्षण आहे. सदर चिल्ड्रन प्ले ग्राऊंड त्वरीत विकसित करून लहान मुलांसाठी विविध प्रकारची खेळणी बसविण्यात यावीत व तदनुषंगिक कामे करण्यात यावीत. सदर कामांसाठी लागणारी तरतूद ही सन २०२१–२०२२ च्या अखर्चित रकमेतून (र.रू. ४० लाख) करण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

( मा. मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर मा. महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.)

( टीप – सदर विषयाचा विचार माहे नोव्हेंबर २०२२ च्या कार्यपत्रिकेवर घ्यावा असा मनपा ठराव क्र.१७४,
दि.२३/९/२०२२ चा झाला आहे. )

**<u>विषय क्र.२२९</u>**

संदर्भ :– १) श्री. प्रसाद कृष्णा पठारे व इतर ९ हक्कदार यांचा आ.क्र.२२३,दि.१३/०५/२०२० चा प्रस्ताव.
२) मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माव्य/७८२,दि.२०/१०/२०२२ चे पत्र.
३) मा.स्थायी समिती ठराव क्र.९८१,दि.२१/१०/२०२२

––––

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे खराडी स.नं. २०/४ व शिवणे खराडी येथील २४ मी. डी.पी. रस्त्यात बाधीत होणारे क्षेत्र २०८६ चौ.मी. क्षेत्रफळापैकी १०४३ चौ.मी. जागेचा ( मोजणीनुसार येणाऱ्या क्षेत्रास अधिन राहून ) ५० % रोख स्वरूपात मोबदला देवून खालील १ ते ५ मुद्दयास अनुसरून मान्यता द्यावी, अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस करण्यात यावी.

१)मा. महा.आयुक्त यांचे विषयपत्रात नमूद केल्याप्रमाणे जागेची ताबे पावती व हस्तांतरण दस्त करून पुणे महानगरपालिकेच्या नावे जागा झाल्यानंतर संबंधितांना रोख रक्कम नुकसान भरपाई अदा करणेस.

२)जागेवर ताब्यात येणारे प्रत्यक्ष क्षेत्र मोजणी नकाशा,७/१२उतारा यामधील कमीत कमी क्षेत्राचा मोबदला अदा करणेस.

३) प्रस्तुत प्रकरणी संबंधीत जागा मालक यांना द्यावयाची मोबदला रक्कम पथ विभागामार्फत पुणे खराडी स.नं. २०/४ व शिवणे खराडी रस्त्यात बाधीत होणाऱ्या ५० % क्षेत्र १०४३ चौ.मी. क्षेत्राचे मुल्यांकनसन २०२२-२३ चे बाजारभावा नुसार(क्षेत्र१०४३चौ.मी.Xशिघ्रसिद्धगणक दर र.रू.२६,६१०/-X८०%) प्रमाणे नुकसान भरपाई र.रू. २,०४,२३,७०७/-अधिक दिलासा र.रू. २,०४,२३,७०७/- असे एकूण र.रू.४,०८,४७,४१४/- इतकी रक्कम उपलब्ध करून देणेस.

४) रजिस्ट्रेशन चार्जेस, स्टॅम्प ड्युटी, जीएसटी हे संबंधित जागा मालक यांचेकडून भरून घेणेस.

५) अर्जदार यांचे दाखल हमीपत्राप्रमाणे संबंधीतांच्या हिश्श्याप्रमाणे रोख मोबदला अदा करणेस.

**<u>विषय क्र.२३०</u>**

संदर्भ :- १) श्री.अमित विनोद बन्सल यांचा दि.२५/०३/२०२१ रोजीचा प्रस्ताव.

२) मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/माव्य/७८३,दि.२०/१०/२०२२ चे पत्र.

३) मा.स्थायी समिती ठराव क्र.९८२,दि.२१/१०/२०२२

----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

पुणे खराडी स.नं. २०/३/१ क, २०/३/१अ/३,२०/३/१अ/२ शिवणेखराडी २४ मी. डी.पी. रस्त्यात बाधीत होणारे क्षेत्र ३०१.४१ चौ.मी. क्षेत्रफळापैकी १५०.७० चौ.मी. जागेचा (मोजणीनुसार येणाऱ्या क्षेत्रास अधिन राहून ) ५०% रोख स्वरूपात मोबदला देवून खालील १ ते ४ मुद्दयास अनुसरून मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

१) मा. महा.आयुक्त यांचे विषयपत्रात नमूद केल्याप्रमाणे जागेची ताबे पावती व हस्तांतरण दस्त करून पुणे महानगरपालिकेच्या नावे जागा झाल्यानंतर संबंधितांना रोख रक्कम नुकसान भरपाई अदा करणेस.

२) जागेवर ताब्यात येणारे प्रत्यक्ष क्षेत्र मोजणी नकाशा,७/१२उतारा यामधील कमीतकमी क्षेत्राचा मोबदला अदा करणेस.

३) प्रस्तुत प्रकरणी संबंधीत जागा मालक यांना द्यावयाची मोबदला रक्कम पथ विभागामार्फत पुणे पेठ खराडी स.नं. २०/३/१ क,२०/३/१अ/३,२०/३/१अ/२ येथील शिवणेखराडी रस्त्यात बाधीत होणाऱ्या ५० % क्षेत्र१५०.७० चौ.मी. क्षेत्राचे मुल्यांकन सन २०२२-२३ चे बाजारभावानुसार (क्षेत्र १५०.७० चौ.मी. X शिघ्रसिद्धगणक दर र.रू. २६,६१०/- X ८०%) प्रमाणे नुकसान भरपाई र.रू. ३२,०८,२०८=५० अधिक दिलासा र.रू. ३२,०८,२०८=५० असे एकूण र.रू. ६४,१६,४१७/- इतकी रक्कम उपलब्ध करून देणेस.

४) रजिस्ट्रेशन चार्जेस, स्टॅम्प ड्युटी, जीएसटी हे संबंधित जागा मालक यांचेकडून भरून घेणेस.

**<u>विषय क्र.२३१</u>**

संदर्भ :- १) श्री.रामजी लालमणी मिश्रा व इतर २ यांचा दि.०९/०३/२०२१ रोजीचा प्रस्ताव

२) मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/माव्य/७८४,दि.२०/१०/२०२२ चे पत्र.

३) मा.स्थायी समिती ठराव क्र.९८३,दि.२१/१०/२०२२

----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

पुणे पेठ खराडी स.नं. २०/३/१ब/१ व २०/३/१ब/३ व शिवणेखराडी २४ मी. डी.पी. रस्त्यात बाधित होणारे क्षेत्र ३४९.६० चौ.मी. क्षेत्रफळापैकी १७४.८० चौ.मी. जागेचा (मोजणीनुसार येणाऱ्या क्षेत्रास अधिन राहून) ५०% रोख स्वरुपात मोबदला देऊन खालील १ ते ५ मुद्यांस अनुसुरुन मान्यता द्यावी, अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

१. मा. महा. आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमूद केल्याप्रमाणे जागेची ताबे पावती व हस्तांतरण दस्त करुन पुणे महानगरपालिकेच्या नावे जागा झाल्यानंतर संबंधीतांना ५०% क्षेत्राची रोख रक्कम नुकसान भरपाई अदा करणेस.

२. जागेवर ताब्यात येणारे प्रत्यक्ष क्षेत्र मोजणी नकाशा, ७/१२ उतारा यामधील कमीतकमी क्षेत्राचा मोबदला अदा करणेस.

३. प्रस्तुत प्रकरणी संबंधीत जागा मालक यांना द्यावयाची मोबदला रक्कम पथ विभागामार्फत पुणे पेठ खराडी स.नं.२०/३/१ब/१ व २०/३/१ब/३ व शिवणेखराडी रस्त्यात बाधित होणाऱ्या ५०% क्षेत्र१७४.८० चौ.मी. क्षेत्राचे मुल्यांकन सन२०२२-२३चे बाजारभावानुसार (क्षेत्र१७४.८०चौ.मी.Xशिघ्रसिद्धगणक दरर.रु. २६,६१०/-X ८०%) प्रमाणे नुकसान भरपाई र.रु. ३७,२१,१४२=५० अधिक दिलासा र.रु ३७,२१,१४२=५० असे एकूण र.रु. ७४,४२,२८५/- इतकी रक्कम उपलब्ध करुन देणेस.

४. रजिस्ट्रेशन चार्जेस, स्टॅम्प डयुटी, जी.एस.टी. हे संबंधीत जागा मालक यांचेकडून भरुन घेणेस.

५. अर्जदार यांचे दाखल हमीपत्रा प्रमाणे संबंधीतांच्या हिश्श्याप्रमाणे रोख मोबदला अदा करणेस.

**विषय क्र.२३२**

संदर्भ :- १) श्री.स्वप्नील कानिफनाथ पठारे व इतर ५ यांचा दि.१३/०५/२०२०रोजीचा प्रस्ताव

२) मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/माव्य/७८५,दि.२०/१०/२०२२ चे पत्र.

३) मा.स्थायी समिती ठराव क्र.९८४,दि.२१/१०/२०२२

----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

पुणे पेठ खराडी स.नं. २०/३/१अ/३ व २०/३/१क व शिवणेखराडी २४ मी. डी.पी. रस्त्यात बाधित होणारे क्षेत्र ८५६.६४ चौ.मी. क्षेत्रफळापैकी ४२८.३२ चौ.मी. जागेचा (मोजणीनुसार येणाऱ्या क्षेत्रास अधिन राहून) ५०% रोख स्वरुपात मोबदला देऊन खालील १ ते ५ मुद्यांस अनुसुरुन मान्यता द्यावी, अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

१. मा. महा. आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमूद केल्याप्रमाणे जागेची ताबे पावती व हस्तांतरण दस्त करुन पुणे महानगरपालिकेच्या नावे जागा झाल्यानंतर संबंधीतांना रोख रक्कम नुकसान भरपाई अदा करणेस.
२. जागेवर ताब्यात येणारे प्रत्यक्ष क्षेत्र मोजणी नकाशा, ७/१२ उतारा यामधील कमीतकमी क्षेत्राचा मोबदला अदा करणेस.
३. प्रस्तुत प्रकरणी संबंधीतजागा मालक यांना द्यावयाची मोबदला रक्कम पथ विभागामार्फत पुणे पेठ खराडी स.नं.२०/३/१अ/३ व २०/३/१क व शिवणेखराडी रस्त्यात बाधित होणाऱ्या ५०% क्षेत्र ४२८.३२ चौ.मी. क्षेत्राचे मुल्यांकन सन २०२२-२३ चे बाजारभावानुसार (क्षेत्र४२८.३२चौ.मी.Xशिघ्रसिद्धगणक दर र.रु. २६,६१०/-X ८०%) प्रमाणे नुकसान भरपाई र.रु.८७,३८,४६९/-अधिक र.रु ८७,३८,४६९/-असे एकूण र.रु. १,७४,७६,९३८/- इतकी रक्कम उपलब्ध करुन देणेस.
४. रजिस्ट्रेशन चार्जेस, स्टॅम्प डयुटी, जी.एस.टी. हे संबंधीत जागा मालक यांचेकडून भरुन घेणेस.
५. अर्जदार यांचे दाखल हमीपत्रा प्रमाणे संबंधीतांच्या हिश्श्याप्रमाणे रोख मोबदला अदा करणेस.

**विषय क्र.२३३**

संदर्भ :- १) मालमत्ता व व्यवस्थापन विभागाकडील जा.क्र. माव्य/६३५३, दि.२४/१२/२०२१

२) मालमत्ता व व्यवस्थापन विभागाकडील जा.क्र. माव्य/५७३३,दि.७/१२/२०२१.

३) मा.महा.आयुक्त यांचे जा. क्र. मआ/भूसंपादन/७८७, दि. २०/१०/२०२२ चे पत्र.

४) मा.स्थायी समिती ठराव क्र.९८६,दि.२१/१०/२०२२

----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

पुणे पेठ शिवाजीनगर येथील सिमला ऑफिस चौक ते पुणे विद्यापीठ दरम्यानच्या ४५ मी. डी.पी. गणेशखिंड रस्ता रुंदीसाठी मा. महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमूद केल्याप्रमाणे बाधित मिळकतीचे सुमारे ७६१.७७ चौ.मी. जागा नवीन भूसंपादन कायदा २०१३ नुसार भूसंपादन करणेस व त्या अनुषंगाने भूसंपादन प्रस्ताव विहीत नमुन्यात मा.जिल्हाधिकारी, भूसंपादन शाखा, पुणे यांजकडेस सादर करणेस मान्यता द्यावी, अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

**विषय क्र.२३४**

संदर्भ :- १) सामान्य प्रशासन यांचे कार्यालयाकडील जा.क्र. साप्रावि/आस्था/प्र-५/३९७९,दि.२१/७/२०२२ अन्वये काढलेले आदेश

२) सामान्य प्रशासन यांचे कार्यालयाकडील जा.क्र. साप्रावि/आस्था/प्र-५/४९५८,दि.१८/८/२०२२ अन्वये काढलेले आदेश.

३) मा. वित्तीय समिती, पुणे महानगरपालिका यांचे दि. १५/७/२०२२ चे इतिवृत्त.

४) मा. मुख्य लेखा व वित्त विभाग,पुणे महानगरपालिका यांचेकडील जा.क्र.१६१३,दि.२६/७/२०२२ चे पत्र.

५) मा.महा.आयुक्त यांचे जा. क्र. मआ/विद्युत/७८९ दि.२०/१०/२०२२ चे पत्र.

६) मा.स्थायी समिती ठराव क्र.९८७,दि.२१/१०/२०२२

----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

पुणे महानगरपालिकेच्या TULIP कार्यक्रमाअंतर्गत इंटर्नशिपसाठी उमेदवारांची नियुक्ती करणे, या कामासाठी खालील लेखाशिर्षातून वर्गिकरणाने १३ लाख रुपये उपलब्ध करुन देणेस मान्यता द्यावी, अशी मा. मुख्य सभेकडे

शिफारस करण्यात येत आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२२-२३ चे अंदाजपत्रक, विद्युत विभाग, बजेटकोड : RE20C109A रस्त्यावरील दिवे व विविध भवनातील दिवे दुरुस्ती व साहित्य खरेदी करणे | १३ लक्ष | --- |
| नवीन सुचविलेले काम - | | |
| विद्युत विभाग, पुणे महानगरपालिकेच्या विद्युत विभागाकरिता कंत्राटी/ इंटर्नशिप / अ‍ॅप्रेंटीस उमेदवारांची नियुक्ती करणे | --- | १३ लक्ष |

**<u>विषय क्र.२३५</u>**

संदर्भ :- १) वित्तीय समितीची मान्यता जा.क्र.६७७,दि.२४/०५/२०२२

२) प्रशासकीय मान्यतेसाठी मा. महापालिका आयुक्त यांजकडेस सादर करण्यात आलेले निवेदन जा.क्र. ८५६, दि. २१/०६/२०२२ व त्यावरील मा. अति. महा. आयुक्त (इ) यांचे आदेश.

३) मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/प्रकल्प/७९५,दि.२५/१०/२०२२ चे पत्र.

४) मा.स्थायी समिती ठराव क्र.१०१७,दि.१/११/२०२२

----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

येरवडा येथे तारकेश्वर पुलाचे रुंदीकरण व टी- जंक्शन विकसित करणेसाठी र.रू. ३ कोटी २८ लक्ष खालीलप्रमाणे वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून देणेसाठी मान्यता द्यावी, अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२२-२०२३ चे अंदाजपत्रक, मुख्य अभियंता (प्रकल्प) , पुणे महानगरपालिका, सन २०२२-२३ च्या अंदाजपत्रकातील तरतूद भूसंपादन, संरक्षण खाते/ अन्य खात्याच्या परवानगी अथवा अन्य स्वरूपाच्या तांत्रिक अडचणी/ प्रश्न मार्गी लागल्यानंतर बंद असलेले / रखडलेले प्रकल्प सुरू करणेसाठी करावयाची तरतूद र.रू. २५००.०० लक्ष बजेट कोड नं. (FE61A118/B-113 ) | र.रू. ३ कोटी २८ लक्ष | --- |
| <u>नवीन सुचविलेले काम -</u> मुख्य अभियंता (प्रकल्प)येरवडा येथे तारकेश्वर पुलाचे रुंदीकरण व टी-जंक्शन विकसित करणे बजेट कोड नं.(CE20B101/T2-101) | --- | र.रू.३कोटी २८ लक्ष |

**<u>विषय क्र.२३६</u>**

संदर्भ :- १) मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/उआवि/ ७९६, दि. २५/१०/२०२२ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१०१८,दि.१/११/२०२२

----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

स्मार्ट सिटी अभियानासाठी पुणे महानगरपालिकेचा हिस्सा पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड यांना अदा करणेसाठी खालील बाबीस मान्यता द्यावी, अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

१) पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेडला सन २०२२-२३ या अर्थिक वर्षात FE50A104 या अर्थशिर्षकामध्ये र.रू. ७५ कोटी रक्कम देणेसाठी तरतूद केलेली आहे. सदर तरतुदीमधून सन २०२२-२३ या अर्थिक वर्षात वेळोवेळी राज्य शासनामार्फत देण्यात येणाऱ्या रक्कमे इतका निधी प्राप्त झालेनंतर व पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड यांनी मागणी केलेनुसार मनपा समहिस्सा देणेस.

२) PSCDCL यांना राज्य शासनामार्फत र.रू. २४.५० कोटी इतकी रक्कम प्राप्त झाल्याने व पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड यांनी मागणी केलेनुसार मनपा समहिस्सा र.रू. २४.५० कोटी देणेस.

३)सदरची रक्कम पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड यांचे नावाने RTGS / धनादेशाने अदा करणेस.

**विषय क्र.२३७**

संदर्भ :- १) मा. महापालिकाआयुक्त यांचे जा.क्र. मआ/घनकचरा/८०७, दि. ३१/१०/२०२२ चे पत्र
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१०४०,दि.९/११/२०२२

----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

पुणे शहरातील घरोघरी निर्माण होणाऱ्या वर्गीकृत कचऱ्याचे संकलन करणेकामी"स्वच्छ पुणे सेवा सहकारी संस्था मर्यादित"या अशासकिय संस्थेबरोबर दि.२६/१०/२०२२ पासून एक वर्षासाठी करार करणेसाठी खालील बाबींस मान्यता द्यावी, अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

१) मा. महापालिका आयुक्त यांनी त्यांचे विषयपत्रात प्रस्तावित केलेल्या धोरणाच्या वरील क्र. १ ते ३३ बाबींस मान्यता मिळणेस.

२) पुणे शहरातील घरोघरी निर्माण होणाऱ्या वर्गीकृत कचऱ्याचे संकलन करणेकामी"स्वच्छ पुणे सेवा सहकारी संस्था मर्यादित" या अशासकिय संस्थेबरोबर दि.२५/१०/२०२२ पासून एक वर्षासाठी सदर संस्थेकडून कामे करून घेणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस.

३) स्वच्छ सहकारी संस्थेला देखरेख वव्यवस्थापन, प्रशिक्षण व नागरिकांमधील जनजागृतीचा खर्च, आवश्यक सेवकवर्गाचे मानधन, महानगरपालिकेशी समन्वय साधणे, क्षेत्रिय कार्यालयांशी समन्वय साधणे, प्रभागनिहाय आरोग्य कोठीवरील सेवकांशी समन्वय साधणे, जनजागृती मोहीम व प्रशिक्षण इ. बाबींसाठी सन २०२२-२३ या कालावधीसाठी RE19A164 या अर्थशिर्षकावर आर्थिक तरतूद उपलब्ध करून मिळणेस व प्रथम वर्षी र.रु. ४,९६,७०,७१२/-, इतका खर्च करणेस व त्यापुढील कालावधीसाठी एकूण पगारापोटीच्या वार्षिक खर्चात दरवर्षी ४% वाढ करणेस व दरवर्षी र.रु.२३,६५,२७२/- प्रशासन, जनजागृती, प्रशिक्षण, फोन, प्रवास, सॉफ्टवेअर, गणवेष व इतर तदनुषंगिक खर्चाच्या अनुषंगाने RE19A125 या अर्थशिर्षकावर आर्थिक तरतूद उपलब्ध करून मिळणेस व खर्च देणेस.

४) दि.२५/१०/२०२२ पासून एक वर्षासाठी ढकलगाडी दुरुस्ती करीता प्रति महिना प्रति कचरा वेचक र.रु.५०/- याप्रमाणे एक वर्षाकरीता र.रु.६००/- आदा करणेस व RE19A125 या अर्थशिर्षकावर आर्थिक तरतूद उपलब्ध करून देणेस.

५) कचरा वेचकांसाठी आवश्यकतेनुसार व ठराविक वारंवारतेमध्ये सुरक्षा प्रावरणे, ढकलगाड्या व बकेट देणे यासाठी सन २०२२-२३ व पुढील कालावधीसाठी RE19A144 या अर्थशिर्षकावर आर्थिक तरतूद उपलब्ध करून देणेस.

६) स्वच्छ संस्थेच्या कचरा वेचकांकडून खालीलप्रमाणे सेवाशुल्क नागरिकांकडून आकारणेस.

अ. वर्गीकृत कचरा गोळा करण्यासाठी प्रत्येक घरापाठीमागे दर महा र.रु. ८०/- इतके शुल्क आकारणेस व पुढील प्रत्येक वर्षाकरीता सेवाशुल्कामध्ये ५ % वाढ करणेस.

आ. झोपडपट्टी भाग, एस.आर.ए. मिळकती व अघोषित वस्त्यांमध्ये प्रति झोपडी दर महा र.रु. ६०/- इतके शुल्क आकारणेस व पुढील प्रत्येक वर्षाकरीता सेवाशुल्कामध्ये ५ % वाढ करणेस व प्रत्येक कचरा वेचकास प्रति झोपडी प्रति महिना र.रु.२०/- प्रोत्साहन भत्ता (slum subsidy) म्हणून देणेस. यासाठी सन २०२२-२३ ते एक वर्षासाठी RE19A116 या अर्थशिर्षकावर आर्थिक तरतूद उपलब्ध करून देणेस.

इ. व्यावसायिकांकडून निर्माण होणा-या कच-याचे संकलन करणेसाठी प्रति व्यावसायिक धारकाकडून दर महा र.रु. १६०/- इतके शुल्क आकारणेस व पुढील प्रत्येक वर्षाकरीता सेवाशुल्कामध्ये १० % वाढ करणेस.

७) वेळोवेळी आढावा घेऊन धोरणात आवश्यक ते बदल करण्याचा अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना प्रदान करणेस.

८) स्वच्छ सहकारी संस्थेचे कामकाज समाधानकारक नसल्यास या संस्थेला पुणे महानगरपालिकेमार्फत देण्यात येणारी मदत तात्काळ थांबण्याचा निर्णय घेणे व पर्यायी व्यवस्था उभारण्याचा निर्णय घेण्याचे अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना प्रदान करणेस.

९) पुणे महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकातील तरतुदीतून पुणे महानगरपालिकेतर्फे आवश्यकतेप्रमाणे स्वच्छ सहकारी संस्थेच्या सभासदांना साहित्य, हातगाड्या, देखभाल-दुरुस्ती खर्च, प्रशासकीय खर्च, गणवेश, संरक्षक हातमोजे, विमासंरक्षण, अत्यावश्यक साहित्य/सुविधा इ.बाबी आवश्यकतेप्रमाणे अदा करण्याचे अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना प्रदान करणेस.

**१०) मा. महापालिका आयुक्त यांनी त्यांचे विषयपत्रात प्रस्तावित केलेल्या धोरणाप्रमाणे पुणे शहरात अंमलबजावणी करणेस.**

**विषय क्र.२३८**

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/भवन/८०८,दि. ३१/१०/२०२२ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१०४१,दि.९/११/२०२२

----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

वारजे स.नं. १३३ पार्ट दिगंबरवाडी शामराव बराटे विद्यालयाचे वाढीव मजल्याचे काम करणेसाठी र.रू. १०० लक्ष खालीलप्रमाणे वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून देणेसाठी मान्यता द्यावी, अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२२-२०२३ चे अंदाजपत्रक, भवन विभाग, पुणे महानगरपालिका, भारतरत्न अटलबिहारीवाजपेयीवैद्यकीय महाविद्यालय, बजेटकोड नं. CE17A242/SJ6-93, | र.रू. १०० लक्ष | --- |
| नवीन सुचविलेले काम - भवन विभाग, पुणे महानगरपालिका,वारजे स.नं. १३३ पार्ट दिगंबरवाडी शामराव बराटे विद्यालयाचे वाढीव मजल्याचे काम करणे. | --- | र.रू. १०० लक्ष |

**विषय क्र.२३९**

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पथ/८११,दि.३१/१०/२०२२ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१०४४,दि.९/११/२०२२

----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

पुणे पेठ एरंडवणा येथील गुळवणी महाराज रस्ता (गोडसे चौक ) ते कर्वे रोड (नळ स्टॉप मेट्रोस्टेशन) दरम्यानचा १२ मी. डी.पी. रस्ता विकसित करणेसाठी कमी पडणारी रक्कम रूपये ४,४७,४२,०००/- चे खालीलप्रमाणे वर्गीकरणाद्वारे उपलब्ध देणेसाठी मान्यता द्यावी, अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२२-२०२३ चे अंदाजपत्रक, मुख्य अभियंता (पथ) कार्यालय,बजेटकोड- CE20A1248/ A 5-1 शहरातील प्रमुख डी.पी. रस्त्यांच्या रूंदीकरणासाठी भूसंपादन करणे . | र.रू.४,४७,४२,०००/- | --- |
| नवीन सुचविलेले काम - मुख्य अभियंता (पथ) कार्यालय पुणे पेठएरंडवणा येथील गुळवणी महाराज रस्ता (गोडसे चौक) ते कर्वे रोड (नळ स्टॉप मेट्रोस्टेशन) दरम्यानचा १२ मी. डी.पी. रस्ता विकसित करणे | --- | र.रू.४,४७,४२,०००/- |

**विषय क्र.२४०**

संदर्भ :- १) मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/आरोग्य/८१४ दि.३१/१०/२०२२ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१०४७ ,दि.९/११/२०२२

----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

पुणे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये मांजर पाळणाऱ्या नागरिकांना परवाना घेताना कुत्र्यास आकारण्यात येणारी फी माजरांना आकारण्यासाठी खालील बाबींस मान्यता द्यावी, अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

१) कुत्रा परवाना धोरणानुसार मांजरीचा परवाना काढणेस.

२) कुत्रा परवान्या प्रमाणे परवाना पुस्तक व बिल्ला उपलब्ध करून देणेस.

३)वर्तमानपत्रातजाहीर प्रकटनाद्वारे जनजागृती करणेस.

४) खालील तक्त्यानुसार फी आकारण्यास व त्यानुसार कागदपत्रे उपलब्ध करून घेणेस.

### मांजरीना आकारण्यात येणाऱ्या फी तक्ता

| अ.क्र. | मांजर परवाना देताना आवश्यक लागणारी कागदपत्र | १ वर्ष कालावधीसाठी आकारण्यात येणारी परवाना फी | प्रतीवर्षी नूतनीकरण फी |
|---|---|---|---|
| १. | १.नागरिकाचा पत्याचा पुरावा. | ४०/– परवाना फी<br>+<br>१०/– बिल्ला फी | २५/– |
| | २. ॲटीरेबीज लसीकरण प्रमाणपत्र. | | |
| | ३. मांजराचा फोटो | ५०/– एकूण फी | |
| २. | प्रती वर्षीनूतनीकरण फी | – | २५/– |

**विषय क्र.२४१**

संदर्भ :– १) मा.स्थायी समिती यांचा ठराव क्र.१५४६,दि.२३/११/२०२१
२) मा.मुख्य सभा ठराव क्र.७१९,दि.२३/१२/२०२१
३) आमचे कार्यालयाकडील श्री शिवाजी राजगड स्मारक मंडळ पुणे यांचे नसआ क्र.१४९१, दि.१८/१०/२०२२ रोजीचे पत्र.
४)मा.नगरसचिव यांचे जा.क्र.८२९,दि.३१/१०/२०२२ चे पत्र.
५) मा.स्थायी समिती ठराव क्र.१०४८ ,दि.९/११/२०२२

––––

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे महानगरपालिका आणि श्री शिवाजी राजगड स्मारक मंडळ,पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने‘ आग्र्याहून सुटका स्मृतिदिन ’ सोहळा किल्ले राजगड येथे साजरा करणेसाठी र.रू. २,९९,०००/– इतकी देणगी खालील अर्थशिर्षकातून अदा करणेसाठी मान्यता द्यावी, अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

सन २०२२–२०२३ चे अंदाजपत्रक

१. मुख्य देखरेखवसुली वगैरे,
क. महानगरपालिका व स्थायी समिती,

२. नगरसचिव यांचे कार्यालय,पान नं.१३९,यादी क्र. R2,
RE11A275/R2-3,श्री शिवाजीमहाराज आग्र्याहून सुटून परत आले तो स्मृती दिन साजरा करणे.

मान्य तरतूद रक्कम रूपये – ५,१५,०००/–

### मा.शहर सुधारणा समितीचे ठराव

**विषय क्र.२४२**

**संदर्भः–** १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/श.अ./टिडीआर/७७७,दि.१९/१०/२०२२ चे पत्र.
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१०७,दि.९/११/२०२२

––––

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे सप्टेंबर २०२२ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | मिळकतीचा तपशील | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टिडीआर झोन | ७/१२ नुसार क्षेत्र | टिडीआर देय क्षेत्र चौ.मी. | डीआरसी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे बाणेर स.नं.६९/२/१८ | प्लेग्राऊंड (PG-6) | अनिल प्रभाकर फाटक | विरळ वस्ती | २८३.०० चौ.मी. | २५५.३५ चौ.मी X२.२०=५६१.७७ चौ.मी. | ००५९६९ | सप्टेंबर २०२२ |

**विषय क्र.२४३**

**संदर्भः-** १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/श.अ./टिडीआर/७७८,दि.१९/१०/२०२२ चे पत्र.
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१०८,दि.९/११/२०२२

-----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे ऑक्टोबर २०२२ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | मिळकतीचा तपशील | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टिडीआर झोन | ७/१२ नुसार क्षेत्र | टिडीआर देय क्षेत्र चौ.मी. | डीआरसी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे बोपोडी स.नं.११क/२अ, सि.स.नं.३३८० | ६१ मी. डी.पी. | रियाज सुलतान मकानी | विरळ वस्ती | ६५.०३ चौ.मी. | ५२.०२ चौ.मी. X२.१५=१११.८४ चौ.मी. | ००५९७८ | ऑक्टोबर २०२२ |
| २. | पुणे बोपोडी स.नं.११क/२अ, सि.स.नं.३३८१ (पै) | | | | २९५.८१ चौ.मी. | २९५.८१ चौ.मी.X २.१५=६३५.९९ चौ.मी | ००५९७९ | ऑक्टोबर २०२२ |

**विषय क्र.२४४**

**संदर्भः-** १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/टिडीआर/७९९,दि.२७.१०.२०२२ चे पत्र.
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.११०,दि.९/११/२०२२

-----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे ऑक्टोबर २०२२ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | मिळकतीचा तपशील | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी होल्डरचे नाव | टिडीआर झोन | ७/१२ नुसार क्षेत्र | टिडीआर देय क्षेत्र चौ.मी. | डीआरसी क्र. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1) | पुणे कोंढवा खु.स.नं. ४अ/1अ/1,हि.नं. 10+11(जुना) स.नं. ४अ/1ब/1 नवीन स.नं.४अ/1अ/1,हि.नं. 12अ,स.नं.४अ/1अ/1, हि.नं.12ब सि.स.नं.३९३ पै | झोपडपट्टी पुनर्वसन योजना | मे.ऑक्सफर्ड प्रॉपर्टीज (कोंढवा प्रोजेक्ट) | सुधारीत नियमावली दि.15(1) –5 नुसार झोन नाहीत | २१८७.१९ चौ.मी. ('ए' इमारतीचे गृहनिर्माण संस्थेची नोंदणी व पुनर्वसन क्षेत्राचे गृहनिर्माण संस्थेची नोंदणी व पुनर्वसन क्षेत्राचे गृहनिर्माण संस्थेस हस्तांतरण झालेनंतर अनुज्ञेय १०% पैकी शिल्लक टिडीआर बाबत) | ००४६५२ | ऑक्टोबर २०२२ |

**विषय क्र.२४५**

**संदर्भः-** १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/टिडीआर/८००,दि.२७.१०.२०२२ चे पत्र.
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१११,दि.९/११/२०२२

----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे ऑक्टोबर २०२२ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | मिळकतीचा तपशील | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी होल्डरचे नाव | टिडीआर झोन | ७/१२ नुसार क्षेत्र | टिडीआर देय क्षेत्र चौ.मी. | डीआरसी क्र. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | फा.प्लॉ. क्र. ५२८/ १५, (स.नं.१३२ अ(पार्ट), पर्वती, पुणे | झोपडपट्टी पुनर्वसन योजना | मे.ओंकार इनव्हेस्टमेंट्स | बी | ९२६.०५ चौ.मी. (झोपडपट्टी पुनर्वसन योजने अंतर्गत इमारतीचे गृहनिर्माण संस्थेची व पुनर्वसन क्षेत्राचे गृहनिर्माण संस्थेस हस्तांतरण झालेनंतर अनुज्ञेय १०% व विक्री घटकातील ०४ सदनिकांचे रूपांतर पुनर्वसन घटकात केलेमुळे निर्माण होणारा फरकाचा टिडीआर) | ००४६५९ | ऑक्टोबर २०२२ |

**विषय क्र.२४६**

**संदर्भः-** १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/टिडीआर/८०१,दि.२७.१०.२०२२ चे पत्र.
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.११२,दि.९/११/२०२२

----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे ऑक्टोबर २०२२ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | मिळकतीचा तपशील | आरक्षणाचा प्रकार | डी. आर. सी. होल्डरचे नाव | टी. डी. आर. झोन | क्षेत्र चौ. मी. | डी. आर. सी. क्र. | डी. आर. सी. दिल्याचा महिना |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | सि.स.नं.५४ एरंडवणा, पुणे | झोपडपट्टी पुनर्वसन योजना | मे.युनिटी कन्स्ट्रक्शन्स | सुधारीत नियमावली दि.१५(१) –५ नुसार झोन नाहीत | २०४.५३१ चौ.मी. ( झोपडपट्टी पुनर्वसन योजने अंतर्गत इमारतीचे अंतिम भोगवटा आदा केले पोटी देय ३०% टी.डी.आर. ) | ००४६५८ | ऑक्टोबर २०२२ |

**विषय क्र.२४७**

**संदर्भः-** १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/टिडीआर/८०२,दि.२७.१०.२०२२ चे पत्र.
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.११३,दि.९/११/२०२२

----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे ऑक्टोबर २०२२ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | मिळकतीचा तपशील | आरक्षणाचा प्रकार | डी. आर. सी. होल्डरचे नाव | टी. डी. आर. झोन | ७/१२ नुसार क्षेत्र | टिडीआर देय क्षेत्र चौ.मी. | डी.आर.सी.क्र. | डी. आर. सी. दिल्याचा महिना |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पुणे बावधन ( खुर्द) येथील स.नं.१/१० ते १६,प्लॉट नं. २१ | ३६.०० मी. डी.पी.रस्ता | श्री.मिलींद गोविंदा पाटील श्रीमती सीमा मिलींद पाटील श्री.गोविंदा जयराम पाटील | विरळ वस्ती | १३७.१६ चौ.मी. | १३७.१६ चौ.मी. X २.१५ =२९४.८९ चौ.मी. | ००५९८६ | ऑक्टोंबर २०२२ |

**विषय क्र.२४८**

**संदर्भः-** १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/टिडीआर/८०३,दि.२७.१०.२०२२ चे पत्र.
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.११४,दि.९/११/२०२२

-----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे ऑक्टोबर २०२२ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यातयेत आहे.

| अ. क्र. | मिळकतीचा तपशील | आरक्षणाचा प्रकार | डी. आर. सी. होल्डरचे नाव | टी. डी. आर. झोन | ७/१२ नुसार क्षेत्र | टिडीआर देय क्षेत्र चौ.मी. | डी.आर.सी.क्र. | डी. आर. सी. दिल्याचा महिना |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पुणे औंध येथील स.नं.१३/५(पै) ( नवीन ) १३/१/५ (जुना) सि.टी.एस .नं.२६१९(पै) | १८ मी. डी.पी. रस्ता | श्री.सिध्देश श्रीनिवास गडियार श्री.सिध्दार्थ श्रीनिवास गडियार तर्फे कुलमुखत्यारधारक मे.पेरेडाईम डेव्हलपर्स प्रा.लि.तर्फे डायरेक्टर श्री.तिमीर रमेश मेहता. | विरळ वस्ती | ४७.०० चौ.मी | ४७.०० चौ.मी. X २.०५ = ९६.३५ चौ.मी. | ००५९९४ | ऑक्टोंबर २०२२ |

**विषय क्र.२४९**

**संदर्भः-** १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/टिडीआर/८०४,दि.२७.१०.२०२२ चे पत्र.
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.११५,दि.९/११/२०२२

----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे ऑक्टोबर २०२२ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यातयेत आहे.

| **अ. क्र.** | **मिळकतीचा तपशील** | **आरक्षणाचा प्रकार** | **डी.आर.सी. होल्डरचे नाव** | **टिडीआर झोन** | **७/१२ नुसार क्षेत्र** | **टिडीआर देय क्षेत्र चौ.मी.** | **डीआरसी क्र.** | **डीआरसी दिल्याचा दिनांक** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे,कर्वेनगर येथील स.नं.३/३अ(पै)हिंगणे (बु.) सि.टी. एस.नं. ६८३ (पै) | ३६ मी . डि.पी. रस्ता | मे.प्रथमेश कन्स्ट्रक्शन्स तर्फे भागीदार श्री. शिरीष गंगाधर रिसवडकर | विरळ वस्ती | ५०२.०० चौ.मी. | ३८१.७४ चौ.मी X २.०५= ७८२.५६ चौ.मी. | ००५९५५ | ऑक्टोबर २०२२ |

**विषय क्र.२५०**

**संदर्भः-** १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/टिडीआर/८१५,दि.०१.११.२०२२ चे पत्र.
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.११७,दि.९/११/२०२२

-----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे ऑक्टोबर २०२२ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यातयेत आहे.

| **अ. क्र.** | **मिळकतीचा तपशील** | **आरक्षणाचा प्रकार** | **डी.आर.सी. होल्डरचे नाव** | **टिडीआर झोन** | **७/१२ नुसार क्षेत्र** | **टिडीआर देय क्षेत्र चौ.मी.** | **डीआरसी क्र.** | **डीआरसी दिल्याचा दिनांक** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे पेठ हडपसर स.नं.१३५/२/२ब(पैकी), स.नं.१३५/२/२अ/१(पैकी), स.नं.१३५/१+३ब(पैकी)(जुना), स.नं.१३५/१/३ब(नवा), स.नं.१३५/१+३अ/१ब(पैकी)(जुना) , स.नं.१३५/१/३अ/१ब(नवा), स.नं.१३५/१+३अ/२(पैकी)(जुना) स.नं.१३५/१अ/२(पैकी) (नवा) सि.स.नं.४९८०,४९८१ पैकी | २४ मी. डि.पी.रस्ता | अशोक श्रीकृष्ण बेहेरे व रामकुमार हिरालाल राठी | विरळ वस्ती | ३६७३.०० चौ.मी. | १८८३.८६ चौ.मी.X२.०० =३७६७.७२ चौ.मी. | ०५९९३ | ऑक्टोबर २०२२ |

## मा.नांव समितीचा ठराव

**विषय क्र.२५१**

**संदर्भः-** १) मुख्य सभा ठराव क्र. ४, दि.२०/०४/२०१७

२) मनपा ठराव क्र.१९, दि.११/४/२०२२

३) मनपा ठराव क्र.१४०, दि.२५/७/२०२२

**विषयः-** पुणे मनपाच्या हददीतील उद्याने, रस्ते, पुल, चौक इतर सार्वजनिक ठिकाणांना योग्य त्या नावाची शिफारस करणे.

नाव समितीची सभा गुरूवार दि.१०/०३/२०२२ रोजी दुपारी ३.३० (तीन वाजून तीस मिनिटे) विशेष समिती सभागृह, दुसरा मजला पुणे महानगरपालिकेची नविन विस्तारित इमारत येथे दृकश्राव्य (व्हिडीओ कॉन्फरन्सींग) द्वारे भरली होती. त्यामध्ये खालील विषय मान्य करण्यात आलेले असून त्यास मान्यता द्यावी, अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| वि.क्र. | सुचकाचे नाव | संक्षिप्त सिमा विस्तार | सुचविलेले नाव | मा.महा.आयुक्त यांचा अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| ५२५ | मा.गणेश ढोरे<br>मा.अश्विनीताई पोकळे | प्रभाग क्र.४२अ,भेकराईनगर, गंगानगर, बनकर शाळेजवळील विरंगुळा केंद्रास | शहिद सौरभ फराटे विरंगुळा केंद्र | मान्य |
| ५३० | मा. श्री. युवराज बेलदरे<br>मा. श्री. वसंत मोरे<br>मा. श्रीमती अमृताताई बाबर<br>मा. सौ. स्मिताताई कोंढरे | प्रभाग क्र.४० मधील फ्लेनगर स.नं. ३४ येथील ओटा मार्केट इमारतीस | " स्व.श्री. संभाजी नाना बेलदरे (मा. सरपंच) बहुउददेशीय भवन" | मान्य |
| ५३१ | मा. श्रीमती रंजना टिळेकर<br>मा. सौ. वृषाली कामठे<br>मा. श्री. विरसेन जगताप | प्रभाग क्र. ४१मध्ये कोंढवा बु.स.नं. २९/२४/२५/१८ येथील ॲमेनिटी स्पेस वरती विकसित करण्यात आलेल्या प्लेस मेकींग या परिसरास | " कै. राजेंद्र मारूती मरळ" | मान्य |
| ५३२ | मा. श्रीमती रंजना टिळेकर<br>मा. सौ. वृषाली कामठे<br>मा. श्री. विरसिंग जगताप | प्रभाग क्र. ४१ मध्ये कोंढवा बु. स.नं. २४ व २५ या परिसरास | " ह. भ.प. कै. बेबीताई रघुनाथ मरळ" | मान्य |
| ५३३ | मा. श्री. प्रकाश ढोरे<br>मा.सौ.अर्चना मुसळे | प्रभाग क्र. ८ ड बोपोडीमधील नवीन ई- लर्निंग शाळेस | " स्व. सुमनताई ज्ञानोबा ढोरे ई- लर्निंग स्कुल" | मान्य |
| ५३४ | मा. सौ. राजश्री नवले<br>मा. श्री. हरिदास चरवड<br>मा. श्री. राजाभाऊ लायगुडे | प्रभाग क्र.३३ मधील प्रयेजा सिटी ते नांदेड सिटी येथील स.नं. ७१ वडगांव बुद्रुक ते स.नं. ३९ वडगाव खुर्द येथील डी.पी. रस्त्यास | " कै. उमाकांत पांडुरंग कुंभारकर पाटील मार्ग" | मान्य |
| ५३५ | मा. श्री. धनराज घोगरे<br>मा. सौ. कालिंदा पुंडे<br>मा. रघुनाथ गौडा | प्रभाग क्र. २५ श्रीमंत महादजी शिंदे मनपा प्राथमिक शाळा क्र. ६२ बी येथे नव्याने तयार होणाऱ्या बास्केट बॉल कोर्ट व पॅवेलियनला | "श्रीमंत महादजी शिंदे बास्केटबॉल कोर्ट व पॅवेलियन" | मान्य |
| ५३६ | मा. सौ. अश्विनी पोकळे<br>मा. श्री. गणेश ढोरे | प्रभाग क्र. ४२ ब धायरी स.नं. ११/४/५ राज ब्लीस व युवानील सोसा.कडे जाणाऱ्या रस्त्यास | " कै. यमुनाताई पोकळे नगर" | मान्य |
| ५३७ | मा. सौ. अश्विनी पोकळे<br>मा. श्री. गणेश ढोरे | प्रभाग क्र. ४२ ब धायरी रायकर मळयाकडे जाणाऱ्या पुलास | " शिवभक्त श्री जैतुजीबाबा रायकर" | मान्य |
| ५३८ | मा.सौ.नंदा लोणकर<br>मा.श्री.संजय घुले<br>मा.श्री.प्रमोद भानगिरे | प्रभाग क्र.२६ क मधील ज्योती हॉटेल चौक ते एन.आय.बी.एम.चौक पर्यंतच्या रस्त्यास | पेरिनशेरी माझदा रस्ता | नांव देणे अडचणीचेआहे अशा अशयाचा मा. मुख्य अभियंता वाहतुक नियोजन विभाग यांचा अभिप्राय मान्य |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५३९ | मा.सौ.हेमलता मगर<br>मा.चेतन तुपे पाटील<br>मा.सुनिल उर्फ बंडुतात्या गायकवाड | प्रभाग.क्र.२२ ब मगरपट्टा येथील मगरपट्टासिटी पोलिस चौकी समोरील मगरपट्टासिटी कडे जाणाऱ्या रस्त्यास | कै.निवृत्ती शंकर मगर पथ | मान्य |

( टीप – सदर विषयाचा विचार माहे नोव्हेंबर २०२२ च्या कार्यपत्रिकेवर घ्यावा असा मनपा ठराव क्र.२०६, दि.२३/९/२०२२ चा झाला आहे. )

**<u>विषय क्र.२५२</u>**

संदर्भ :– १) मुख्य सभा ठराव क्र.४, दि.२०/४/२०१७

२) मा.सुशिल मेंगडे व मा.सौ.सुनिता वाडेकर यांची दि.१७/२/२०२२ ची उपसूचना.

३) मुख्य सभा ठराव क्र.८३४,दि.१७/२/२०२२

४) मुख्य सभा ठराव क्र.८४,दि.१७/६/२०२२

५) मुख्य सभा ठराव क्र.१२०,दि.२५/७/२०२२

विषय :– पुणे मनपाच्या हददीतील उद्याने, रस्ते, पुल, चौक इतर सार्वजनिक ठिकाणांना योग्य त्या नावाची शिफारस करणे.

––––––

**संदर्भ क्र.२ च्या उपसूचनेनुसार –**

वरील विषयांकित बाबींवर निर्णय घेण्यासाठी नैमित्तिक समितीची (नांव समितीची) सभा बुधवार **दि.१५/१२/२०२१** रोजी **दुपारी ०३.०० ( तीन )वाजता** विशेष समिती सभागृहात भरली होती.सदरचे नांव समितीचे निवेदन दि.१७/२/२०२२ च्या मा.मुख्य सभेत मान्यतेसाठी आले असता मा.मुख्य सभा विषय क्र.७०८ मधील अनु.क्र.१८० हा विषय माहे जून २०२२ च्या कार्यपत्रिकेवर घ्यावा असा मनपा ठ.क्र.८३४,दि.१७/२/२०२२ संदर्भ क्र.२ चे उपसूचनेनुसार निर्णय झाला आहे.

| वि.क्र | संक्षिप्त सिमा विस्तार | सुचविलेले नांव | निर्णय |
|---|---|---|---|
| १८० | औंध येथील पुणे मनपा शाळा क्र.८७ मुलांची या शाळा इमारतींच्या आवारातील क्रिडांगणास | योगीराज रामचंद्र मुसळे | मान्य |

( टीप – सदर विषय माहे नोव्हेंबर २०२२ च्या कार्यपत्रिकेवर घ्यावा असा मुख्य सभा ठराव क्र.२०७,दि.२३/९/२०२२ चा झाला आहे. )

**<u>विषय क्र.२५३</u>**

संदर्भ :– १) मुख्य सभा ठराव क्र.४, दि.२०/४/२०१७

२) मा.सुशिल मेंगडे व मा.सौ.सुनिता वाडेकर यांची दि.१७/२/२०२२ ची उपसूचना.

३) मुख्य सभा ठराव क्र.८३७,दि.१७/२/२०२२

४) मुख्य सभा ठराव क्र.८५,दि.१७/६/२०२२

५) मुख्य सभा ठराव क्र.१२१,दि.२५/७/२०२२

विषय :– पुणे मनपाच्या हददीतील उद्याने, रस्ते, पुल, चौक इतर सार्वजनिक ठिकाणांना योग्य त्या नावाची शिफारस करणे.

––––––

**संदर्भ क्र.२ च्या उपसूचनेनुसार –**

वरील विषयांकित बाबींवर निर्णय घेण्यासाठी नैमित्तिक समितीची (नांव समितीची) सभा बुधवार **दि.१५/१२/२०२१** रोजी **दुपारी ०३.१५ ( तीन वाजून पंधरा )वाजता** विशेष समिती सभागृहात भरली होती.सदरचे नांव समितीचे निवेदन दि.१७/२/२०२२ च्या मा.मुख्य सभेत मान्यतेसाठी आले असता मा.मुख्य सभा विषय क्र.७११ मधील अनु.क्र.२९२ हा विषय माहे जून २०२२ च्या कार्यपत्रिकेवर घ्यावा असा मनपा ठ.क्र.८३७,दि.१७/२/२०२२ संदर्भ क्र.२ चे उपसूचनेनुसार निर्णय झाला आहे.

| वि.क्र | संक्षिप्त सिमा विस्तार | सुचविलेले नांव | निर्णय |
|---|---|---|---|
| २९२ त्वर्य | प्रभाग क्र.८ब, औंध येथील पुणे महानगरपालिका शाळा क्र.८७ब,च्या स्टेडियमच्या पाठीमागे निर्माण केलेल्या महिला कुस्ती केंद्राला. | स्व.गुलाबराव देवराव मुंढे | मान्य |

( टीप – सदर विषय माहे नोव्हेंबर २०२२ च्या कार्यपत्रिकेवर घ्यावा असा मुख्य सभा ठराव क्र.२०८,दि.२३/९/२०२२ चा झाला आहे. )

**मा.सभासदांचा प्रस्ताव**

**विषय क्र.२५४**

संदर्भ :- मा. धनराज घोगरे व मा.राजेश येनपुरे यांची सूचना दि.२८/२/२०२०

१) मा.शिवाजी केदारी व मा.सुधीर जानजोत यांचे दि.१४.१२.९३ चे पत्र

२) मा.शिवाजी केदारी व मा.अभय छाजेड यांचे दि.१४.६.९४ चे पत्र.

३) मा.सौ.भावना केदारी व मा.रामदास पवार यांचे दि.१७.६.९७ चे पत्र.

४) शहर सुधारणा समिती ठ.क्र.(१)११४०,दि.१६.१२.९३(२)१३१,दि.२३.६.९४ (३) ९३,दि.१९.६.९७

५) मा.अति.महा.आयुक्त (वि) यांनी पत्र क्र.मआ–नअ–वियो–२४८,दि.२५.५.२०००ने पाठविलेला अभिप्राय

६) शहर सुधारणा समिती ठराव क्र.२२२,दि.१४.७.२०००

----

१) वानवडी स.नं.६२, हि.नं.७,८ मधून २० फुटांचा रस्ता आखण्याचा ठराव आहे. जागेवर हिश्श्यांचे मध्य भागातील ३० फुट रस्त्याचे पूर्वेस श्री.बिलाल मिस्त्री यांची जागा आहे. मिस्त्री यांचे जागेत पूर्वेकडे गुंठेवारी पध्दतीची बांधकामे झालेली आहे. तेथील रहिवासियांनी वर नमूद केल्याप्रमाणे १० ते १२ फुटाची जागा सामाईक रस्त्यासाठी मोकळी जोडलेली आहे. या रिहवासियांना रस्ता मिळणे आवश्यक आहे. मूळ ठरावात नमूद केल्याप्रमाणे हिश्याचे मध्यभागातून रस्ता आखावयाचा झाल्यास श्री.मिस्त्री यांनी प्रथमच पासूनच अशा रस्त्याच्या आखणीस विरोध केल्यास्तव मिस्त्री यांनी सुचविल्याप्रमाणे त्यांचे जागेच्या दक्षिणेकडील १० फुट जागा रस्त्यासाठी त्यांनी मोकळी सोडली आहे. त्यांचे जागेतून दक्षिण उत्तर असा ( चॅम्पर) हा आखावा लागणार आहे. श्री.मिस्त्री यांचे पूर्वेकडील जागेतील गुंठेवारी पध्दतीची बांधकामातील सुटलेल्या जागेचाही सामाईक रस्त्याची रूंदी ही.डी.सी.रूल नियम क्र.१२.३ नुसार मिळत नसल्याने त्या भागात रस्ता आखणे संयुक्तिक होणार नाही. यास्तव सोबतच्या नकाशात दर्शविल्याप्रमाणे अ, ब.ब–१ आद्याक्षराप्रमाणे दर्शविल्यानुसार २० फुट रूंदीचा रस्ता आखणे योग्य होईल.

२) वानवडी स.नं.६२,हि.नं.६ मध्येही गुंठेवारी पध्दतीची बांधकाम असून तेथेही सामाईक रस्त्यासाठी सुटलेली जागाही १० ते १२ फुट इतकीच आहे. डी.सी.रूल क्र.नियम क्र.१२ नुसार सामाईक रस्त्यासाठी सुटलेली जागा ही रूंदीपात्र ठरत नसल्याने याही हिश्यात पुरेशी रूंदी अभावी रस्त्याची आखणी करणे संयुक्त होणार नाही.

३) वानवडी स.नं.६२, हि.नं.१ ते १२ मध्येही दक्षिण–उत्तर अशीच गुंठेवारी पध्दतीची बांधकामे असून तिथेही १० ते १२ फुट सामाईक रस्त्यासाठी जागा सुटलेली आहे. डी.सी.रूल नियम क्र.१२.३ नुसार रस्त्याच्या रूंदी मिळत नसल्याने रस्ता आखणे संयुक्तिक होणार नाही.

तरी वानवडी स.नं.६२, हि.नं.७–८ मधून मा.महा.आयुक्त यांच्या पत्रासोबतच्या नकाशात अ–ब–ब१ या आद्याक्षराने दर्शविल्याप्रमाणे २० फुट रूंदीचा रस्ता आखणेस मान्यता देण्यात येत आहे.

असा मनपा ठराव क्र.२२०, दिनांक२४/८/२००० चा ठराव मान्य झाला असून सदर ठरावाचा फेरविचार करुन खालीलप्रमाणे ठराव मान्य करण्यात यावा.

संदर्भ :- १) मा.शिवाजी केदारी व मा.सुधीर जानजोत यांचे दि.१४.१२.९३ चे पत्र

२) मा.शिवाजी केदारी व मा.अभय छाजेड यांचे दि.१४.६.९४ चे पत्र.

३) मा.सौ.भावना केदारी व मा.रामदास पवार यांचे दि.१७.६.९७ चे पत्र.

४) शहर सुधारणा समिती ठ.क्र.(१)११४०,दि.१६.१२.९३(२) १३१,दि.२३.६.९४ (३) ९३,दि.१९.६.९७

५) मा.अति.महा.आयुक्त(वि)यांनीपत्रक्र.मआ–नअ–वियो–२४८,दि.२५.५.२०००ने पाठविलेला अभिप्राय

६) शहर सुधारणा समिती ठराव क्र.२२२,दि.१४.७.२०००

७) मनपा ठराव क्र.२०७ दि.२१/१२/२०२०

८) मनपा ठराव क्र.१८७,दि. २१/९/२०२१

९) मनपा ठराव क्र.२०,दि. ११/४/२०२२

१०) मनपा ठराव क्र.१४१,दि.२५/७/२०२२

----

वानवडी स.नं.६२, हि.नं.७-८ मधून मा.महा.आयुक्त यांच्या पत्रासोबतच्या नकाशात अ-ब-ब१ या आद्याक्षराने दर्शविल्याप्रमाणे २० फुट रूंदीचा रस्ता आखावा असे दर्शविलेले आहे. परंतु 'अ' आद्याक्षराने दर्शविलेला रस्ता हा रद्द करण्यात यावा.कारण सदर ठिकाणी पर्यायी रस्ता उपलब्ध आहे. त्यामुळे मा.महा.आयुक्त यांच्या पत्रासोबतच्या नकाशात 'ब-ब१' या आद्याक्षराने दर्शविलेला रस्ता २० फुट रूंदीचा आखण्यात यावा.

(टिप - सदर विषयाचा विचार माहे नोव्हेंबर २०२२ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.२०९, दि.२३/९/२०२२ चा झाला आहे.)

**<u>मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र</u>**

**<u>विषय क्र.२५५</u>**

श्री.राजेंद्र राऊत हे दि.३१/७/२०२२ रोजी वयोपरत्वे पुणे महानगरपालिका सेवेतुन सेवानिवृत्त झाले आहेत. त्यामुळे पुणे महानगरपालिका हद्दीत नव्याने समाविष्ट ११ गावांच्या प्रारूप विकास आराखडयाचे उर्वरित कामकाज पूर्ण करणेसाठी श्री.युवराज देशमुख (बी.ई.सिव्ही) अधिक्षक अभियंता, पुणे महानगरपालिका यांची नेमणूक करणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/शआ/७७५,दि.१९/१०/२०२२ चे पत्र.

**नगरसचिव**
**पुणे महानगरपालिका**